प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# गाण्यातून नौशाद ते अजय-अतुल सांगीतिक प्रवास

## प्रा. डॉ. मृदुला दाढे-जोशी : बाळासाहेब वाघ स्मृती व्याख्यान

नाशिक : पुढारी वृत्तसेवा



प्रसिद्ध संगीतकार नौशाद ते अलीकडच्या काळातील अजय-अतुल यांच्या काळापर्यंत हिंदी चित्रपटसृष्टीत सर्जनशील संगीत प्रतिभेने रसिकमनावर राज्य करणाऱ्या अनेक संगीतकारांचा प्रवास संगीत अभ्यासक, प्रसिद्ध गायिका डॉ. मृदुला दाढे-जोशी यांनी सप्रयोग व्याख्यानातून उलगडला.

बाळासाहेब वाघ स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानाचे १८ वे पुष्प सोमवारी (दि.१७) शंकराचार्य संकुलातील डॉ. कुर्तकोटी सभागृहात 'नौशाद ते अजय-अतुल : एक संगीत प्रवास' या विषयावर डॉ. दाढे यांनी गुंफले. ज्येष्ठ गायक, संगीतकार पंडित शंकरराव वैरागकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

### एस. डी. बर्मन यांचे संगीतात 'गोलाई'

हिंदी चित्रपटसृष्टीतील संगीतकारांच्या वैशिष्ट्यांवर प्रा. डॉ. दाढे यांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले. त्या म्हणाल्या, एस. डी. बर्मन यांच्या संगीतात बंगाली संगीताचा गोडवा आणि गोलाई होती. त्यानंतरच हिंदी गाण्यात 'बंगाली मिंड' लोकप्रिय झाली, असे सांगून त्यांनी विविध गाणी सादर केली. 'पियाँ तो से नयना लागे रे', 'आयेगा आयेगा' या गाण्याला उपस्थितांनी मनमुराद दाद दिली.

हिंदी चित्रपटसृष्टीत मूकपट बोलपट आणि पार्श्वगायन असे महत्त्वपूर्ण टप्पे आहेत. गानकोकिळा लता मंगेशकर यांचे हिंदी चित्रपटसृष्टीत पार्श्वगायिका म्हणून आगमन झाल्यानंतर या आवाजाने जादूई करिष्मा करत हिंदी गाण्याचे संदर्भच बदलले आणि त्यानंतर लतादीदींचे पर्व सुरू झाले, असे सांगून डॉ. दाढे यांनी आपल्या सुरेल आवाजांनी उपस्थितांवर मोहिनी घातली. त्या म्हणाल्या, हिंदी चित्रपट गीतांवर प्रारंभी शास्त्रीय रागदारी, लोकसंगीत अन् रवींद्र संगीताचा मोठा प्रभाव राहीला. नंतर अनेक संगीतकारांनी त्यात प्रतिभेने विलक्षण बदल करून नवीन प्रवाह सुरू केला. लता मंगेशकर यांचे हिंदी चित्रपटात गायिका म्हणून आगमन झाल्यानंतर संगीतकार नौशादजींना खोल झिरपणारा गायिकेला स्वरांचे कुठलेही बंधन नसलेला भावाभिव्यक्ती प्रगट करणारा आवाज गवसला. त्यानंतर हिंदी गाण्याची सर्वच ठोकताळे, समीकरणे लता मंगेशकरांनी मोडून संगीतकारांच्या प्रतिभेला धुमारे देणारे सूर प्रत्येक गायकीतून प्रगट केले हे त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले.

प्रारंभी संस्थेच्या विश्वस्त शकुंतला वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. सुनील कुटे यांच्यासह रसिकांची उपस्थिती होती.